## आजचे पंचांग

बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम
संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण,
वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष,
षष्ठी संध्याकाळी ७-०२ पर्यंत,
दिवस नक्षत्र– मूळ अहोरात्र,
चंद्र रास- धनु, सूर्य रास = मीन,
गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई:** मुंराज्य शासनाने मंगळवारी प्रशासकीय स्तरावर मोठे फेरबदल करत ११ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये पुणे, नाशिक आणि जळगावसह मंत्रालयातील महत्त्वाच्या विभागांमधील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे (पुणे) व्यवस्थापकीय संचालक राहुल रंजन महिवाल यांची बदली आता महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या सदस्य सचिवपदी करण्यात आली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ८ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### अमली पदार्थ तस्करांना अटक

**श्रीनगर :** पोलिसांनी काश्मीरच्या विविध भागांतून चार अमली पदार्थ तस्करांना अटक केली आणि त्यांच्या ताब्यातून प्रतिबंधित पदार्थ जप्त केले. त्यांनी पुलवामा जिल्ह्यातील चेवाकलान येथे नाकाबंदीदरम्यान गुलाम हसन वानीला अटक केली आणि त्याच्या ताब्यातून २.३० किलोग्रॅम अफूचा पाला जप्त केला. बारामुल्लामध्ये गस्त घालत असताना फारूक अहमद भट आणि निसार अहमद वार या दोन जणांना अटक केली.

### नव्या जागतिक व्यवस्थेकडे वाटचाल

**सिंगापूर :** सिंगापूरच्या एका मंत्र्याने मंगळवारी सांगितले की, सध्याची जागतिक अस्थिरता ही जगाच्या "जुन्या जागतिक व्यवस्थे"कडून अद्याप उदयास न आलेल्या "नवीन जागतिक व्यवस्थे"कडे होणाऱ्या संक्रमणामुळे निर्माण झाली आहे. "सध्याची जागतिक अस्थिरता ही गेल्या आठ दशकांतील 'जुनी जागतिक व्यवस्था' आणि अद्याप उदयास न आलेली नवीन जागतिक व्यवस्था यांच्यातील संक्रमणकालीन टप्प्यातून निर्माण झाली आहे. हा संक्रमणकाळ भू-राजकीय बदलांचा सर्वात धोकादायक टप्पा आहे," असे बालकृष्णन म्हणाले.

### बॉम्ब हल्ल्याचा तपास एनआयएकडे

**इम्फाळ :** मणिपूरचे मुख्यमंत्री वाय खेमचंद सिंह यांनी मंगळवारी सांगितले की, बिष्णुपूर जिल्ह्यात झालेल्या बॉम्ब हल्ल्याचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे सोपवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या हल्ल्यात दोन मुलांचा मृत्यू झाला होता. हे कृत्य राज्यातील शांतता भंग करण्यामध्ये स्वार्थ असलेल्या व्यक्ती किंवा गटांचे कारस्थान असल्याचे दिसते, असे ते म्हणाले.

### इराणची संस्कृती एका रात्रीत नष्ट करण्याचा दिला इशारा

# ट्रम्प हे विनाशक विचारांचे धनी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन/तेहरान :** पश्चिम आशियातील तणाव शिगेला पोहोचला असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अत्यंत कठोर शब्दांत इशारा दिला आहे. परिस्थिती नियंत्रणात आली नाही, तर "एक संपूर्ण संस्कृती नष्ट होऊ शकते," असा थेट दावा ट्रम्प यांनी केल्याने जागतिक पातळीवर खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांच्या विनाशक विचारांनी जगाला अशांततेच्या कड्यावर आणून उभे केले आहे.

'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर भूमिका मांडताना ट्रम्प म्हणाले, "आज रात्री एक संपूर्ण संस्कृती कायमची नष्ट होऊ शकते. ती पुन्हा कधीच उभी राहणार नाही. मला तसे व्हावे असे वाटत नाही, पण तसे होण्याची शक्यता आहे." त्यांनी आजची रात्र जागतिक इतिहासातील अत्यंत निर्णायक ठरू शकते, असेही नमूद केले. मात्र, परिस्थितीनुसार शेवटच्या क्षणी लष्करी कारवाई थांबवण्याची शक्यता असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

ट्रम्प यांनी पुढे इराणमधील सत्ताबदलाचाही उल्लेख करत, "आता अधिक शहाणे आणि कमी कट्टर नेतृत्व पुढे येऊ शकते. कदाचित काहीतरी मोठे घडेल," असे म्हटले. "४७ वर्षांचा भ्रष्टाचार आणि हिंसाचाराचा काळ संपेल," असे म्हणत त्यांनी इराणच्या जनतेसाठी शुभेच्छाही व्यक्त केल्या.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीसंदर्भात अमेरिकेने इराणला ८ एप्रिलपर्यंत (अमेरिकन वेळेनुसार रात्री ८ वाजेपर्यंत) अंतिम मुदत दिली आहे. या जलमार्गातून जागतिक इंधन पुरवठा मोठ्या प्रमाणात होत असल्याने, तो अडवण्याचा प्रयत्न केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. भारतीय वेळेनुसार ही मुदत बुधवारी पहाटे संपणार आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला देण्यात आलेला ४८ तासांचा अल्टिमेटम वारंवार वाढवण्यात आल्याने तो आता ४०८ तासांपर्यंत पोहोचला आहे. मार्चअखेरीस दिलेली १० दिवसांची मुदतही संपल्यानंतर पुन्हा वाढवण्यात आली. या सततच्या मुदतवाढीमुळे अमेरिकेच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

निरीक्षकांच्या मते, ट्रम्प यांची भाषा जरी आक्रमक असली, तरी वारंवार दिली जाणारी मुदतवाढ ही पडद्यामागील मुत्सद्दी हालचालींचा भाग असू शकते. त्यामुळे प्रत्यक्ष युद्ध टळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसरीकडे, इराणने अमेरिकेचा दबाव स्पष्टपणे फेटाळला आहे. अमेरिकेच्या अटी मान्य करण्याचा प्रश्नच येत नाही, अशी ठाम भूमिका तेहरानने घेतली आहे. २८ फेब्रुवारीपासून अमेरिकन आणि इस्रायली कारवायांमुळे तणाव अधिकच वाढला असून, खार्ग बेटावरील महत्त्वाच्या तेल निर्यात केंद्रावर हल्ला झाल्याचाही दावा करण्यात आला आहे. आता अंतिम मुदत जवळ येत असताना, पुढील घडामोडींकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## पाकिस्तानात जनता रस्त्यावर एनर्जी लॉकडाऊन लागू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे शेजारील देश असलेल्या पाकिस्तानची झोप उडाली आहे. या आंतरराष्ट्रीय तणावाचा मोठा फटका पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला बसला असून देशात इंधनाच्या किमतींनी उच्चांक गाठला आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सरकारला संपूर्ण देशात 'एनर्जी लॉकडाऊन' लागू करावा लागला आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या गगनाला भिडलेल्या किमतींमुळे पाकिस्तानी जनतेचा संयम सुटला असून, कराचीपासून पेशावरपर्यंत जनक्षोभ पाहायला मिळत आहे. 'डॉन' वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, कराची, हैदराबाद आणि सुक्कुर यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये नागरिक आणि राजकीय नेत्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली आहेत. जैकोबाबादसह अनेक ठिकाणी महागाईविरोधात संताप व्यक्त केला जात असून, वाढत्या किमतींमुळे सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. एकीकडे जागतिक युद्धाची भीती आणि दुसरीकडे देशांतर्गत पेटलेले आंदोलन यामुळे पाकिस्तान सरकार पूर्णपणे बॅकफूटवर आले आहे. पाकिस्तानातील वाढत्या महागाईने आता टोक गाठले असून, सुक्कुरमध्ये 'सिंध युनायटेड पार्टी'ने सरकारविरोधात संताप व्यक्त करण्यासाठी एक आगळेवेगळे आंदोलन केले. महागाई आणि इंधन दरवाढीचा निषेध करण्यासाठी आंदोलकांनी चक्क अंगावर 'कफन' परिधान करून प्रेस क्लबसमोर प्रतीकात्मक उपोषण केले.

## कुंभमेळा टेंडर घोटाळ्याची चर्चा; ऑडिओ क्लिप व्हायरल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** कुंभमेळ्याच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप समोर आला असून, लाचखोरीप्रकरणी अटकेत असलेला मंत्रालयातील कक्ष अधिकारी विलास लाड याची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. यात कुंभमेळ्याशी संबंधित टेंडर प्रक्रिया 'मॅनेज' करत कोट्यवधींच्या कमिशनचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र प्रतिक्रिया देत सखोल चौकशीची मागणी केली आहे. या कथित व्यवहारात नेमके कोणते अधिकारी आणि मंत्री सामील आहेत, हे उघड झाले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. लाचलुचपत विभागाच्या कारवाईत विलास लाड याला ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. या ऑडिओ क्लिपमध्ये कुंभमेळ्यासाठीच्या सुमारे हजारहून अधिक निविदा आधीच ठरवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. १५ हजार कोटी रुपयांच्या निधीपैकी मोठा हिस्सा 'व्यवस्थापन' करून मिळवता येत असल्याचेही संभाषणात सूचित केले आहे. ई-टॉयलेट, साफसफाई, तंबू उभारणी आणि भोजन व्यवस्थेसारख्या कामांमधून मोठ्या प्रमाणात कमिशन मिळत असल्याचेही यात म्हटले आहे. यामुळे कुंभमेळ्याच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

### मुंबईत मेट्रो, पॉड टॅक्सी आणि बोगदा प्रकल्पांना वेग

# चार महत्त्वाच्या कामांचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई शहरातील वाहतूक आणि पायाभूत सुविधांना मोठी चालना देणाऱ्या चार महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन आज करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मेट्रो, पॉड टॅक्सी आणि बोगदा प्रकल्पांना गती देण्यात आली.

यामध्ये मेट्रो ९ अंतर्गत दहिसर पूर्व ते काशिगाव दरम्यान मेट्रो सेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच मेट्रो २ बी मार्गावरील महाराष्ट्र नगर–मंडाळे ते देशभक्त एन. जी. आचार्य उद्यान–डायमंड गार्डन, चेंबूर या मार्गालाही गती देण्यात आली आहे.




या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मेट्रो २ बी मार्गावर टप्प्याटप्प्याने स्थानके सुरू केली जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात पाच स्थानके, दुसऱ्या टप्प्यात सहा आणि तिसऱ्या टप्प्यात आठ स्थानके सुरू होतील. सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतर मुंबईच्या पूर्व, पश्चिम आणि उत्तर-दक्षिण भागांना एकसंध जोडणी मिळणार आहे. अंधेरी-वांद्रे परिसरासह हार्बर लाईनला जोडणारी ही पहिलीच मेट्रो लाईन असल्याचे त्यांनी नमूद केले. या मेट्रो स्थानकांची रचना ऊर्जा बचतीचा विचार करून करण्यात आली असून, नैसर्गिक सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर होईल अशी व्यवस्था आहे. मंडाळे येथे ७२ लाईनचा मोठा मेट्रो डेपो उभारण्यात आला असून, तेथे प्रशिक्षण सुविधाही उपलब्ध करण्यात येणार आहेत. मुंबईतील वाहतूक सुलभ करण्यासाठी २०१६-१७ मध्ये जाहीर केलेल्या धोरणानुसार शहरात एक तासात कुठेही पोहोचण्याची व्यवस्था उभी करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. मेट्रो नेटवर्क पूर्ण झाल्यानंतर सुमारे ७० लाख प्रवासी दररोज मेट्रोचा वापर करतील आणि लोकल ट्रेनवरील ताण कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय रस्ते प्रकल्पांनाही वेग देण्यात येत असून, नॉर्थ कोस्टल रोड आणि बोगदा प्रकल्पांमुळे पूर्व-पश्चिम जोडणी अधिक सक्षम होणार आहे. बोरीवली ते ठाणे बोगद्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, बीकेसी ते कुर्ला दरम्यानचा पॉड टॅक्सी प्रकल्पही हाती घेण्यात आला असून, हा प्रकल्प केवळ २० महिन्यांत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या एलिव्हेटेड पॉड प्रणालीमध्ये सहा प्रवासी बसू शकतात आणि प्रवाशांच्या उपलब्धतेनुसारच सेवा सुरू होईल, अशी अत्याधुनिक यंत्रणा वापरण्यात येणार आहे. यामुळे लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारून वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. एमएमआरडीएने हे काम कोणत्याही अडथळ्याशिवाय वेगाने पूर्ण करावे, अशी सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शहरातील इतर भागातही अशा प्रणालीचा विस्तार करता येईल, असे स्पष्ट केले.

### केंद्र सरकारने घेतला ऐतिहासिक निर्णय

# अमरावतीला आंध्र प्रदेशाच्या राजधानीचा दर्जा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली/अमरावती :** आंध्र प्रदेशाच्या राजधानीबाबत अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अनिश्चिततेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. केंद्र सरकारने अमरावती शहराला अधिकृत आणि कायमस्वरूपी राजधानीचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यासंदर्भात ६ एप्रिल २०२६ रोजी गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मंजुरीनंतर हा निर्णय अमलात आला आहे.

आंध्र प्रदेश पुनर्गठन (संशोधन) विधेयक २०२६ ला संसदेत मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्यात आला. २ एप्रिल रोजी लोकसभा आणि राज्यसभेत हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाले.

कायदा मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, सुधारित कायदा २ जून २०२४ पासून लागू मानण्यात येणार आहे. यामुळे २०१४ च्या मूळ आंध्र प्रदेश पुनर्गठन कायद्यात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यात प्रस्तावित 'तीन राजधानी' मॉडेलवर पडदा पडला आहे. भविष्यात राजधानी बदलण्याचे पर्याय जवळपास संपुष्टात आले आहेत.

राज्यातील प्रशासनिक कामकाज आता एका ठिकाणी केंद्रित होणार असल्याने स्थैर्य आणि कार्यक्षमता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. २०१५ मध्ये तेलगू देसम पक्ष सरकारच्या काळात अमरावतीला राजधानी म्हणून विकसित करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र २०१९ मध्ये वायएसआर काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यानंतर तीन राजधानींचा प्रस्ताव पुढे आला आणि प्रकल्प रखडले. आता २०२४ मध्ये एनडीए सरकार सत्तेत आल्यानंतर अमरावतीला राजधानी म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे आंध्र प्रदेशातील प्रशासनिक गोंधळ संपुष्टात येऊन विकास प्रकल्पांना गती मिळेल, अशी अपेक्षा आहे. एकाच राजधानीमुळे शासन यंत्रणा अधिक प्रभावीपणे काम करू शकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### मौसम बेनझीर नूर कोट्याधीश

**मालदा (पश्चिम बंगाल) :** मालदाच्या मालतीपूर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार मौसम बेनझीर नूर यांनी आपल्या नामनिर्देशन प्रतिज्ञापत्रात अडीच कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता असल्याचे जाहीर केले असून, आपल्याविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचेही म्हटले आहे. नूरचे वार्षिक उत्पन्न २०२०-२१ या आर्थिक वर्षातील ७.२३ लाख रुपयांवरून २०२४-२५ या आर्थिक वर्षात १०.९७ लाख रुपयांपर्यंत वाढले. याच काळात पती मिर्झा कायेस बेग याचे उत्पन्न ४.९८ लाख रुपयांवरून ७.०१ लाख रुपयांपर्यंत वाढले. नूर यांनी १.४६ कोटी रुपयांची एकूण जंगम मालमत्ता जाहीर केली.

## कृषी वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र वितरण कंपनी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) कंपनीचे औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती व इतर सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठीची वितरण संस्था आणि कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) असे विभाजन करून दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बिगर कृषी वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीने विविध पायाभूत योजनांसाठी घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी आहे.

या कर्ज दायित्वापोटी महाराष्ट्र शासन पंधरा वर्षे मुदतीचे दीर्घकालिन सरकारी रोखे जारी करणार आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा कमी होऊन आर्थिक स्थिती आणखी चांगली होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील ग्राहकांना ऊर्जा सुरक्षा आणि गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील बाजारपेठीय संधीचा लाभ घेण्यासाठी अशा दोन कंपन्यांची निर्मिती केली जाईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शिफारशी तसेच मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.० च्या धोरणात्मक उद्दिष्टानुसार एमएसईबी सोलार अॅग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी ३१ मे २०२३ रोजी स्थापन करण्यात आली आहे.

या कंपनीच्या माध्यमातून शेतीसाठीच्या वीज पुरवठ्याचे नियोजन आणि सौर ऊर्जेवर आधारित कृषि ऊर्जा प्रणाली विकसित करण्यासाठी संस्थात्मक आधारभूत रचना निर्माण होणार आहे.

### अवकाळी पावसामुळे राज्यात मोठे नुकसान

# राज्यातील १.८० लाख शेतकऱ्यांना १२८ कोटींची मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले असून, या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना सुमारे १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली.

या कालावधीत अवकाळी पावसामुळे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. परिणामी मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले. या नुकसानीचा सर्वाधिक फटका चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना बसला होता.

जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतही अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. या तीन महिन्यांत सुमारे १ लाख ४५ हजार ६०६ हेक्टर क्षेत्राखालील पिकांचे नुकसान झाले असून २ लाख ३३ हजार ८९० शेतकरी बाधित झाले आहेत. केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा आणि ज्वारी या प्रमुख पिकांना या पावसाचा फटका बसला आहे. लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा आणि बीड या जिल्ह्यांमध्ये नुकसान अधिक झाले आहे. या अवकाळी पावसामुळे मानवी आणि पशुधनाचीही हानी झाली आहे. राज्यात पाच जणांचा मृत्यू झाला असून नऊ जण जखमी झाले आहेत. तसेच ३६ जनावरांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसानेही परिस्थिती आणखी बिकट केली आहे. प्राथमिक अंदाजानुसार १ लाख ९४ हजार ३२९ शेतकऱ्यांच्या १ लाख २२ हजार ९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, अंतिम आकडेवारीनंतर मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

जलसंपदा विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार जुलै २०२२ पासून राज्यात ४१ प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून त्यातून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा निर्माण झाला आहे. या प्रकल्पांमुळे २.९५ लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता उपलब्ध झाली आहे. याशिवाय आतापर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित आणि प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यात एकूण ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असल्याचेही

## वाहतूक कोंडीतून मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वाकड परिसरातील दत्त मंदिर रस्त्यावर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर अखेर ठोस उपाययोजना करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने मंगळवारी (७ एप्रिल) मोठी कारवाई करत म्हातोबानगर येथील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या शेकडो झोपड्यांवर बुलडोझर चालवला. या कारवाईमुळे ४५ मीटर रुंदीच्या रस्त्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे.

दत्त मंदिर रस्ता हा वाकड परिसरातील अत्यंत महत्त्वाचा अंतर्गत मार्ग असून तो हिंजवडी आयटी पार्क आणि मुख्य महामार्गाशी जोडला जातो. त्यामुळे या रस्त्यावर दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्ता अरुंद असल्यामुळे येथे वारंवार तासन्तास वाहतूक कोंडी होत होती. या पार्श्वभूमीवर महापालिकेने रस्ता रुंदीकरणाचा निर्णय घेतला होता; मात्र म्हातोबानगरमधील झोपडपट्ट्यांमुळे हे काम दीर्घकाळ रखडले होते. झोपडपट्टीधारकांचे कायदेशीर पुनर्वसन पूर्ण केल्यानंतरच ही कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने मोठा पोलीस बंदोबस्त आणि अवजड यंत्रसामग्रीच्या सहाय्याने झोपड्या हटवल्या. या कारवाईनंतर दत्त मंदिर रस्ता रुंद होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाकड परिसरातील वाहतुकीचे चित्र यामुळे लवकरच बदलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

# सुरक्षेचा आव आणलेली असुरक्षितता



**राष्ट्रीय सुरक्षा हा शब्द जितका अपरिहार्य, तितकाच तो सत्तेसाठी उपयुक्त ठरतो. खरे धोके आणि राजकीय सोयी यामधील सीमारेषा पुसट होत चालली आहे. प्रश्न बाह्य शत्रूंचा नाही; प्रश्न आहे, सुरक्षेच्या नावाखाली अंतर्गत असुरक्षिततेचे राजकारण किती वाढू द्यायचे.**

राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न हा कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाशी निगडित असतो. सीमांचे रक्षण, दहशतवादाचा मुकाबला, गुप्तचर यंत्रणांची सजगता, सायबर क्षेत्रातील सज्जता या सर्वांचा त्यात समावेश होतो. पण या गंभीर आणि आवश्यक संकल्पनेचा वापर जर राजकीय कवच म्हणून होऊ लागला, तर तीच संकल्पना संशयास्पद ठरते. सध्या नेमकी हीच स्थिती दिसते. सुरक्षा हा विषय निर्विवाद. पण त्याच नावाखाली प्रश्न विचारण्यालाच संशयाच्या चौकटीत उभे केले जाऊ लागले, तर समस्या डोके वर काढते. कारण लोकशाही व्यवस्थेत सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा संघर्ष नसतो; त्यांचा समतोल असतो. तो समतोल ढळला, की सुरक्षा हीच नियंत्रणाचे साधन बनते. गेल्या काही वर्षांत 'राष्ट्रीय सुरक्षा' या संकल्पनेचा व्याप वाढत चालला आहे. पारंपरिक लष्करी धोक्यांच्या पलीकडे जाऊन आता माहिती, संवाद, सामाजिक वातावरण, डिजिटल व्यासपीठे या सर्वांनाही सुरक्षेच्या चौकटीत आणले जात आहे. वरकरणी हे योग्य वाटते. पण या विस्तारामुळे राज्याच्या अधिकारांचाही विस्तार होत आहे, हे लक्षात घ्यावे लागते. याच ठिकाणी एक सूक्ष्म पण महत्त्वाचा बदल घडतो. सुरक्षा ही बाह्य धोके ओळखून त्यांना तोंड देण्याची यंत्रणा राहात नाही; ती अंतर्गत असहमती नियंत्रित करण्याचे साधन बनू लागते. मतभिन्नता व्यक्त करणे, सरकारवर टीका करणे, धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे या गोष्टींना 'सुरक्षेचा मुद्दा' म्हणून रंगवले जाऊ लागते. आणि एकदा हा बदल घडला, की लोकशाहीची गाभा हळूहळू कमकुवत होऊ लागतो. राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने पाहिले, तर ही प्रवृत्ती नवीन नाही. इतिहासात अनेकदा सत्ताधाऱ्यांनी असुरक्षिततेच्या भावनेतून नियंत्रण वाढवण्याचा मार्ग स्वीकारला आहे. बाह्य शत्रूचा धोका अधोरेखित करणे, अंतर्गत विरोधकांना संशयाच्या छायेत ठेवणे आणि सुरक्षेच्या नावाखाली कठोर उपाययोजना करणे हा एक परिचित पॅटर्न आहे. फरक इतकाच की आज तो अधिक परिष्कृत आणि तांत्रिक स्वरूपात दिसतो. खरी अडचण इथेच आहे. कारण जेव्हा सुरक्षा हा मुद्दा पुढे येतो, तेव्हा त्यावर प्रश्न विचारणे अवघड बनते. 'सुरक्षा' या शब्दालाच एक नैतिक वर्चस्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे कोणताही विरोध सहजपणे देशविरोधी ठरवता येतो. हीच त्या संकल्पनेची ताकद आणि धोकाही आहे. पण प्रश्न असा आहे की सुरक्षा कोणासाठी आणि कशासाठी? जर नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा येत असेल, अभिव्यक्तीवर मर्यादा येत असतील आणि सार्वजनिक चर्चेचे क्षेत्र संकुचित होत असेल, तर ती सुरक्षा कोणाच्या हिताची? कारण राष्ट्राची सुरक्षा ही केवळ सीमांवर उभी नसते; ती समाजाच्या विश्वासावर उभी असते. लोकशाही व्यवस्थेची खरी ताकद तिच्या टीकाकारांमध्ये असते. जेव्हा विरोधक मोकळेपणाने बोलू शकतात, तेव्हा शासन अधिक जबाबदार राहते. पण जेव्हा विरोधकांवरच संशय घेतला जातो, तेव्हा शासन अधिक बंदिस्त होते. आणि बंदिस्त व्यवस्था बाह्यदृष्ट्या मजबूत दिसली, तरी आतून कमकुवत होत जाते. सुरक्षेच्या नावाखाली भीती निर्माण करणे हेही एक राजकीय साधन असते. भीतीमुळे समाज एकत्र येतो, पण तो विचार करणे थांबवतो. प्रश्न विचारणे कमी होते, निर्णयांवर चर्चा कमी होते आणि शासनाला अधिक स्वातंत्र्य मिळते. अल्पकालीन दृष्टीने हे सत्तेसाठी फायदेशीर ठरते; पण दीर्घकालीन दृष्टीने ते लोकशाहीसाठी घातक असते. जागतिक पातळीवरही हीच प्रवृत्ती दिसते. युद्धांचे सावट, आर्थिक अस्थिरता, तंत्रज्ञानातील बदल या सर्वांमुळे सरकारे अधिक सजग झाली आहेत. पण या सजगतेचा परिणाम अनेकदा अधिक नियंत्रणात होतो. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यामधील समतोल राखणे हीच खरी कसोटी ठरते. भारतातील संदर्भात हा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. कारण देशासमोर खरे सुरक्षा धोकेही आहेत. सीमावाद, दहशतवाद, सायबर हल्ले या सर्वांचा सामना करावा लागतो. त्यामुळे सुरक्षेला प्राधान्य देणे आवश्यकच आहे. पण याच कारणामुळे सुरक्षेच्या नावाखाली घेतलेल्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारणे अधिक महत्त्वाचे ठरते. सुरक्षा ही राज्याची जबाबदारी नसते; तर ती नागरिकांच्या विश्वासावर उभी असते. जर नागरिकांना वाटले की सुरक्षेच्या नावाखाली त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित होत आहे, तर त्या व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. आणि विश्वास कमी झाला, की सुरक्षा अधिकच कमकुवत होते. म्हणूनच आजची खरी कोंडी बाह्य शत्रूंची नाही; ती अंतर्गत समतोलाची आहे. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यामधील रेषा कुठे आखायची, हा प्रश्न आहे. सुरक्षेचा आव आणून असुरक्षितता लपवता येते; पण ती दूर होत नाही. उलट ती अधिक गडद होते. आणि जेव्हा असुरक्षिततेला कवच म्हणून सुरक्षा वापरली जाते, तेव्हा लोकशाहीचा पाया हळूहळू ढासळू लागतो.

# इंधनदरांचे मृगजळ आणि अर्थकारणाची कसोटी



**» इंधनदरांमध्ये कपात झाल्याची भावना निर्माण करणे आणि प्रत्यक्षात दर स्थिर ठेवणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. जागतिक बाजारात तेल महाग होत असताना देशांतर्गत दिलासा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, तो खरा आहे का, हा प्रश्न.**

इंधनदरांचा प्रश्न भारतात केवळ अर्थकारणापुरता मर्यादित राहत नाही; तो थेट राजकारणाशी जोडला जातो. पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढले की त्याचा परिणाम थेट जनतेच्या दैनंदिन जीवनावर होतो. वाहतूक खर्च वाढतो, वस्तू महाग होतात आणि महागाईचा दबाव सर्वच स्तरांवर जाणवू लागतो. त्यामुळे कोणतेही सरकार इंधनदर वाढीचा निर्णय सहजपणे घेऊ शकत नाही. पण याच कारणामुळे अनेकदा वास्तव लपवण्याचा मोहही निर्माण होतो.

सध्या नेमकी हीच स्थिती दिसते. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढत असताना देशांतर्गत दर मात्र स्थिर ठेवले गेले आहेत. वरकरणी पाहता ही गोष्ट दिलासा देणारी वाटते. पण अर्थकारणाच्या दृष्टीने विचार केला, तर ही स्थिरता नैसर्गिक नाही. कारण कच्च्या तेलाचा खर्च वाढला आणि त्याचा परिणाम अंतिम दरावर झाला नाही, तर तो खर्च कुठेतरी तरी जाईलच. हा खर्च दोन मार्गांनी पुढे ढकलला जातो. एक म्हणजे सरकार स्वतःच्या महसुलात कपात करते. उत्पाद शुल्क कमी करून दर वाढीचा काही भाग स्वतः उचलते. दुसरा मार्ग म्हणजे तेल कंपन्यांवर तोटा सहन करण्याची वेळ आणली जाते. या दोन्ही उपायांचा परिणाम तात्पुरता दिलासा देतो; पण दीर्घकालीन दृष्टीने ते टिकाऊ नसतात.

याठिकाणी 'दहा रुपयांची कपात' ही कल्पना समोर येते. ग्राहकाच्या मनात असा समज निर्माण होतो की त्याला थेट फायदा झाला आहे. पण प्रत्यक्षात ही कपात अनेकदा आकड्यांपुरतीच मर्यादित राहते. कारण बाजारातील मूळ किंमत वाढत असताना दिलासा दिला जातो. म्हणजे वाढ कमी झाली, पण दर खरेच कमी झाले, असे म्हणता येत नाही. हीच या संपूर्ण प्रक्रियेतील विसंगती आहे.

अर्थकारणाचा एक साधा नियम आहे की, किंमती वास्तवाशी जोडलेल्या असतात. त्या काही काळासाठी दडपून ठेवता येतात; पण कायमस्वरूपी नियंत्रित करता येत नाहीत. इंधनदरांच्या बाबतीतही हेच लागू होते. जर जागतिक बाजारात तेल महाग होत असेल, तर त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारावर होणारच. तो तात्पुरता थांबवता येईल; पण पूर्णपणे टाळता येणार नाही. या प्रक्रियेत आणखी एक समस्या निर्माण होते ती म्हणजे बाजारातील असमतोल. जेव्हा दर कृत्रिमरीत्या स्थिर ठेवले जातात, तेव्हा काही क्षेत्रांमध्ये त्याचा परिणाम दिसू लागतो. उदाहरणार्थ, व्यावसायिक इंधन, विमान इंधन किंवा इतर ऊर्जा स्रोतांच्या किंमती वाढू लागतात. म्हणजेच एकाच वेळी दोन वेगवेगळे बाजार तयार होतात, एक नियंत्रित आणि एक वास्तवाशी जोडलेला. ही स्थिती दीर्घकाळ टिकणे कठीण असते.

सरकारसमोरची अडचणही इथेच आहे. इंधनदर वाढवले तर तात्काळ जनतेचा रोष ओढवतो. दर स्थिर ठेवले तर आर्थिक ताण वाढतो. महसूल कमी होतो, कंपन्यांवर दबाव येतो आणि पुढील काळात मोठी दरवाढ करावी लागण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजेच अल्पकालीन दिलासा आणि दीर्घकालीन स्थैर्य यामधील निवड करावी लागते. याठिकाणी धोरणात्मक स्पष्टता महत्त्वाची ठरते. इंधनदर पूर्णपणे बाजाराशी जोडायचे असतील, तर त्यातील चढउतार स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागते. अन्यथा दरांवर नियंत्रण ठेवायचे असेल, तर त्यासाठी लागणारा आर्थिक खर्चही स्पष्टपणे मान्य करावा लागतो. सध्या मात्र या दोन टोकांच्या मध्ये अडकलेली भूमिका दिसते.

भारतातील कररचना देखील या प्रश्नात महत्त्वाची आहे. इंधनाच्या किंमतीत करांचा मोठा वाटा असतो. त्यामुळे दर कमी करण्यासाठी करकपात हा सोपा मार्ग असतो. पण हा मार्ग कायमस्वरूपी वापरता येत नाही. कारण सरकारच्या महसुलावर त्याचा थेट परिणाम होतो. विकासकामांसाठी आवश्यक निधी कमी पडू शकतो. दीर्घकालीन उपायांचा विचार केला, तर इंधनदरांचा प्रश्न केवळ किंमतींचा नाही; तो ऊर्जा धोरणाचा आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, पर्यायी ऊर्जा स्रोत वाढवणे, सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. अन्यथा दर नियंत्रणाचा हा खेळ सतत सुरू राहणार आहे. 'दहा रुपयांची कपात' ही केवळ आकड्यांची कसरत आहे की खरा दिलासा, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. कारण ग्राहकाला तात्पुरता दिलासा देणे सोपे असते; पण त्याला वास्तव सांगणे कठीण असते. अर्थकारण मात्र या भावनांवर चालत नाही; ते वास्तवावर चालते. आज इंधनदर स्थिर दिसत असले, तरी त्या स्थिरतेमागे वाढत्या खर्चाचा ताण दडलेला आहे. तो किती काळ दडवून ठेवता येईल, हा खरा प्रश्न आहे. कारण बाजाराच्या नियमांना फार काळ रोखून ठेवणे शक्य नसते. आणि म्हणूनच इंधनदरांचा प्रश्न हा केवळ दरांचा नाही; तो विश्वासाचा आहे. सरकार ग्राहकाला तात्पुरता दिलासा देत आहे की दीर्घकालीन स्थैर्याचा मार्ग निवडत आहे, यावरच या धोरणाचे खरे मूल्यमापन ठरेल.

# जय परशुराम सेवा संघात नव्या नेतृत्वाला संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** जय परशुराम सेवा संघ पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीच्या निवड प्रक्रियेत हनुमंत रामदासी यांची शहराध्यक्षपदी तर सिद्धांत चौधरी यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे संघटनेत नव्या नेतृत्वाला संधी मिळाली असून कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवड प्रक्रियेवेळी उपस्थित मान्यवरांनी नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन शहराध्यक्ष हनुमंत रामदासी यांनी संघटनेच्या बळकटीसाठी सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची ग्वाही दिली. तसेच समाजहिताचे विविध उपक्रम राबवून संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

या निवडीमुळे जय परशुराम सेवा संघाच्या कार्याला नवी दिशा मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

या निवड प्रक्रियेमध्ये ज्येष्ठ मार्गदर्शक अशोक काका मुळे, शशिकांत तुळशे, महेश जोशी गुरुजी, सल्लागार शशिकांत कुलकर्णी गुरुजी, सभासद सदस्य सागर जोशी,लक्ष्मण कुलकर्णी, संदिप कुलकर्णी आणि सर्व सदस्य मोठ्या उपस्थित होते.

# अनधिकृत फलकांवर कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराचे सौंदर्य आणि शिस्तबद्धता जपणे ही प्रशासनाबरोबरच नागरिकांचीही जबाबदारी असून, अनधिकृत जाहिरात फलक, बॅनर्स आणि भिंतींवरील जाहिरातींमुळे होणारे शहराचे विद्रुपीकरण सहन केले जाणार नाही, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.

महापालिका हद्दीत सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतरित्या लावण्यात येणारे फलक, फ्लेक्स, बॅनर्स तसेच महावितरण डीपी, दूरध्वनी खांब आणि भिंतींवर चिकटवलेल्या जाहिरातींमुळे शहराचे स्वरूप बिघडत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रीय अधिकारी, विभागप्रमुख आणि बीट निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून अशा सर्व अनधिकृत जाहिराती तात्काळ हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच जाहिरातींवर नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकांच्या आधारे संबंधित जाहिरातदारांना नोटिसा बजावून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही प्रकारचे अनधिकृत जाहिरात फलक किंवा भिंतींवरील जाहिराती लावणे हा नियमबाह्य प्रकार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच इतर लागू कायद्यांनुसार संबंधितांवर कारवाई केली जाईल.

# पिंपरी-चिंचवडमध्ये अस्वच्छता कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात उघड्यावर कचरा टाकण्याच्या प्रकारांमध्ये वाढ होत असून, अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याने अस्वच्छतेची समस्या गंभीर बनत आहे. महापालिकेकडून नियमित साफसफाई आणि सुशोभिकरण करूनही काही बेशिस्त नागरिकांमुळे शहराची स्वच्छता राखण्याच्या प्रयत्नांना तडा जात असल्याचे चित्र दिसत आहे.

महापालिकेने इंदूरच्या धर्तीवर शहर कचराकुंडीमुक्त करण्याचा निर्णय घेत सर्व सार्वजनिक कचराकुंड्या हटवल्या आहेत. घंटागाड्यांद्वारे घरोघरी जाऊन ओला आणि सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृतीही केली जात आहे. मात्र, या उपाययोजनांनंतरही काही नागरिकांकडून कचरा प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून मोकळ्या जागा, रस्त्याच्या कडेला, पदपथांवर तसेच नदीपात्र, नाले आणि गटारांमध्ये फेकला जात आहे. दंडाची भीती टाळण्यासाठी काही जण रात्रीच्या वेळी कचरा टाकून निघून जातात, असे आढळले आहे.

शहरातील वाढत्या अस्वच्छतेच्या मुद्द्यावर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही नगरसेवकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. प्रशासनाने कोट्यवधी रुपयांचा दंड वसूल करूनही नागरिकांच्या सवयीमध्ये अपेक्षित बदल होत नसल्याने स्वच्छता मोहिमेचे आव्हान कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मावळ बाजार समितीत राजीनाम्यांचा भूकंप

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदाच्या निवडणुकीनंतर मोठ्या राजकीय उलथापालथी घडत असून, १८ पैकी तब्बल ९ सदस्यांनी सहाय्यक निबंधक कार्यालयात आपले राजीनामे सादर केले आहेत. या घडामोडींमुळे बाजार समितीचे भवितव्य अनिश्चित झाले असून संस्था बरखास्त होणार की कार्यरत राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राजीनाम्यानंतर आता समितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ आणि भाजपचे ५ असे एकूण ९ सदस्य उरले आहेत. या संख्येवर गणसंख्या पूर्ण होते का, याबाबतचा अंतिम निर्णय सहाय्यक निबंधक नवनाथ अनपट घेणार आहेत. त्यांच्या निर्णयावरच समितीचे पुढील अस्तित्व अवलंबून राहणार आहे.

सभापती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा अनपेक्षित पराभव झाल्यानंतर रविवारी राजकीय हालचालींना वेग आला. या पार्श्वभूमीवर सुप्रिया मालपोटे, अंजली जांभुळकर, भरत टकले, अमोल मोकाशी, मारुती वाळुंज, दिलीप ढोरे, विक्रम कलवडे, नथुराम वाघमारे आणि विलास मालपोटे या सदस्यांनी राजीनामे दिले.

विशेष म्हणजे, बाजार समितीत राष्ट्रवादी काँग्रेसकडे १२ आणि काँग्रेसचा १ असे मिळून १३ सदस्यांचे स्पष्ट बहुमत होते, तर भाजपचे केवळ ५ सदस्य होते. तरीही निवडणुकीत राष्ट्रवादीला ७-११ असा पराभव पत्करावा लागला. यावरून पक्षातील किमान सहा मते फुटल्याचे स्पष्ट झाले आहे. या पराभवानंतर आमदार सुनील शेळके यांनी पक्षातील सदस्यांना तातडीने राजीनामे देण्याचे आदेश दिल्याचे समोर आले आहे. परिणामी, एकाच वेळी मोठ्या संख्येने सदस्यांनी पदाचा राजीनामा दिल्याने समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, आता उर्वरित सदस्यसंख्येच्या आधारे समिती कार्यरत राहू शकते का किंवा बरखास्तीची प्रक्रिया सुरू होणार का, याबाबत प्रशासनाचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे मावळ तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महापौर रवी लांडगे यांचे प्रतिपादन

# नियोजनबद्ध कामामुळे मालमत्ता कर संकलनात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** नियोजनबद्ध कामकाज, काटेकोर अंमलबजावणी आणि वेळेवर घेतलेल्या निर्णयांमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर संकलनात उल्लेखनीय वाढ झाली असल्याचे प्रतिपादन महापौर रवी लांडगे यांनी केले. करसंकलन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे हे यश साध्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

महापालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागातर्फे आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील मालमत्ता कर संकलन मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १८ विभागीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. तसेच आगामी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर बिल वाटप मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महिला बचत गटांना प्रशिक्षण देण्यासाठी निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाला उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्या सुलभा उबाळे, निकिता कदम, सारिका मासुळकर, नीता पाडळे, उपायुक्त सचिन पवार आणि जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.

'अभय योजना' प्रभावीपणे राबवल्याबद्दल उपायुक्त सचिन पवार यांचे महापौर आणि आयुक्तांसह मान्यवरांनी विशेष कौतुक केले. महापौर रवी लांडगे म्हणाले की, शहराच्या प्रगतीत महिलांचा वाटा महत्त्वाचा असून महिलांमार्फत केलेल्या नियोजनबद्ध बिल वाटपामुळे यंदा कर वसुलीत वाढ झाली. 'अभय योजने'मुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून सुमारे ७० हजार मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेतला. यंदा ५ लाखांहून अधिक नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने कर भरल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी सांगितले की, महसूल वाढीसोबतच महिलांना स्वावलंबी बनवण्यावर महापालिकेने भर दिला आहे. 'सिद्धी' ॲपमुळे कर प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक झाली असून गेल्या तीन वर्षांत ६०० हून अधिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सचिन पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# एकाच दिवशी तीन अपघात, एकाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरात बेफाम धावणाऱ्या टिप्परमुळे अपघातांची मालिका सुरूच असून सोमवारी एकाच दिवशी घडलेल्या तीन भीषण अपघातांनी शहर हादरले. या अपघातांत एका नागरिकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

बर्ड व्हॅली चौक येथे झालेल्या अपघातात एका निष्पाप नागरिकाचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे या वर्दळीच्या ठिकाणी शाळा असतानाही एकाच दिवशी सलग अपघात घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे. इतर दोन अपघातांत नागरिक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर आमदार अमित गोरखे यांनी तातडीने पोलीस आणि महापालिका प्रशासनाशी संपर्क साधून कठोर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. बर्ड व्हॅली चौकात वाहतूक कोंडी, झेब्रा क्रॉसिंगची दुरवस्था, सिग्नल आणि शास्त्रोक्त स्पीड ब्रेकरचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. शहरातील अपघातप्रवण ठिकाणे ओळखून तेथे तातडीने वाहतूक नियंत्रण यंत्रणा उभारावी, तसेच जड वाहनांवर निर्बंध आणावेत, अशी मागणी त्यांनी केली. विशेषतः शाळांच्या परिसरात सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग आणि गतिरोधक बसवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अंड्यांचे दर कोसळले, पोल्ट्री व्यवसाय संकटात

**भोर** : आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता थेट पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात उमटू लागले असून पोल्ट्री व्यवसाय अडचणीत सापडला आहे. अंड्यांची निर्यात घटल्यामुळे बाजारात साठा वाढला असून दरात मोठी घसरण झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या संघर्षामुळे व्यापार आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. यामुळे अंड्यांच्या निर्यातीत लक्षणीय घट झाली असून देशांतर्गत बाजारपेठेत अंड्यांचा पुरवठा वाढला आहे. परिणामी दर कोसळले असून सध्या एका अंड्यामागे सरासरी दीड रुपयांपर्यंत घसरण झाल्याचे व्यावसायिक सांगत आहेत. दर घसरत असताना उत्पादन खर्च मात्र वाढत असल्याने पोल्ट्री व्यावसायिकांना आर्थिक ताणाचा सामना करावा लागत आहे. खाद्य तसेच औषधांच्या दरात वाढ झाल्याने खर्च वाढत आहे. उत्पन्न घट आणि खर्च वाढ अशा दुहेरी संकटात उत्पादक सापडले आहेत.

### जन्मदात्यांनीच केला मुलीचा बालविवाह

**आळंदी** : ज्या वयात शिक्षण आणि स्वप्नांचा पाठलाग करायचा असतो, त्या वयातच १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर मातृत्वाची वेळ आल्याचा धक्कादायक प्रकार चहोली खुर्द परिसरात उघडकीस आला आहे. आई-वडिलांनी जबरदस्तीने बालविवाह लावून दिल्यानंतर सासरी झालेल्या अत्याचारांमुळे ही मुलगी अल्पवयातच आई बनली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार मे २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडला. पीडित अल्पवयीन असतानाही तिच्या आई-वडिलांनी आणि मामाने कायद्याची जाणीव असूनही तिचे लग्न लावून दिले. सासरी तिच्यावर सातत्याने शारीरिक अत्याचार करण्यात आले. या अत्याचारांमुळे ती गरोदर राहिली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आळंदी पोलिसांनी पती, सासू-सासरे, तसेच पीडितेचे आई-वडील आणि मामा अशा एकूण सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## वनदेव वस्तीवर भीषण आग, लाखोंचे नुकसान

# शेतमजुराचा संपूर्ण संसार जळून खाक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी येथील वनदेव वस्तीवर सोमवारी दुपारी भीषण आग लागून शेतमजूर राहुल सिताराम खंडागळे यांचा संपूर्ण संसार काही क्षणांत जळून खाक झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सोमवारी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याने खंडागळे कुटुंबाचे लाकडी कुडाचे घर पूर्णतः भस्मसात झाले. आगीची तीव्रता इतकी होती की घरातील संसारोपयोगी साहित्य, ज्वारी, बाजरी, तांदूळ यांसह धान्यसाठा, मुलांची शालेय पुस्तके, भुईमुगाच्या शेंगांची पोती तसेच शेतीसाठी वापरला जाणारा फवारणी पंप आणि इतर साहित्य पूर्णपणे जळून नष्ट झाले.



या आगीत सात गाभण शेळ्या आणि त्यांची लहान करडे दगावल्याने कुटुंबावर मोठा आर्थिक व मानसिक आघात झाला आहे. त्याचबरोबर काही दिवसांपूर्वीच बँकेतून काढलेली सुमारे ६० हजार रुपयांची रोख रक्कमही आगीत जळून खाक झाली. महसूल विभागाने या दुर्घटनेत अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची नोंद केली आहे.

गावडेवाडी येथे त्या दिवशी यात्रा असल्याने बहुतांश ग्रामस्थ बाहेर गेले होते. त्यामुळे आग लागल्याचे उशिरा लक्षात आले. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आग लागल्याचे समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत संपूर्ण घर जळून खाक झाले होते.

राहुल सिताराम खंडागळे हे मूळ जवळके बुद्रुक (ता. खेड) येथील रहिवासी असून शेतमजुरीसाठी गावडेवाडी येथे वास्तव्यास होते. या घटनेनंतर खंडागळे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. घटनेनंतर ग्रामस्थांकडून तातडीने मदत देण्याची मागणी होत असून शासनानेही आर्थिक मदत आणि पुनर्वसनासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

## एमपीएससी परीक्षेत प्रांजली सावंत राज्यात प्रथम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वित्त विभागातील 'कर सहाय्यक' संयुक्त गट क परीक्षेत प्रांजली बाळासाहेब सावंत हिने इतर मागास वर्ग (महिला १) प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांक मिळवत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे राजगुरूनगर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रांजलीने कोणत्याही क्लासचे मार्गदर्शन न घेता घरीच अभ्यास करून हे यश मिळवले. आईच्या कष्टांची जाणीव ठेवत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तिने पहिल्याच प्रयत्नात ही कामगिरी करून दाखवली. सोमवारी (दि. ६) निकाल जाहीर होताच प्रांजलीच्या राजगुरूनगर येथील निवासस्थानी नातेवाईक आणि विश्वेश्वर कॉलनीतील रहिवाशांनी मोठी गर्दी केली. पेढे वाटून, फटाके फोडून तिच्या यशाचा जल्लोष साजरा करण्यात आला. तसेच कॉलनीत



भव्य मिरवणूकही काढण्यात आली.

प्रांजलीचे बारावीपर्यंतचे शिक्षण महात्मा गांधी विद्यालय, राजगुरूनगर येथे झाले असून पदवीचे शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पूर्ण केले. २०२३ पासून ती स्पर्धा परीक्षेची तयारी करत होती. वडगाव पाटोळे येथील सोनाली पाटोळे यांनी तिला मार्गदर्शन केले. प्रांजलीच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रसवंतीगृहांकडे वाढती वर्दळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : वाढत्या उन्हामुळे तापमानाचा पारा चढत असून नागरिक उष्णतेने हैराण झाले आहेत. उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिक झाडांच्या सावलीचा आश्रय घेत असून थंड पेयांकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत. विशेषतः ऊसाच्या रसासाठी रसवंतीगृहांवर नागरिकांची गर्दी वाढताना दिसत आहे.

दुपारच्या सुमारास उन्हाचा तडाखा अधिक जाणवत असल्याने शेतकरी, कामगार, प्रवासी आणि विद्यार्थी ऊसाच्या रसाला प्राधान्य देताना दिसत आहेत. नैसर्गिक, ताजेतवाने आणि परवडणारे पेय म्हणून ऊसाचा रस लोकप्रिय ठरत आहे.

लोणी येथील रसवंतीगृहांवर परिसरातील नागरिक ऊसाचा रस पिण्यासाठी आवर्जून येत आहेत. वाढत्या उन्हामुळे सकाळी दहा वाजल्यापासून ते सायंकाळी चार ते पाच वाजेपर्यंत ग्राहकांची



मोठी वर्दळ असते, अशी माहिती रसवंतीगृह चालक संदीप रोकडे यांनी दिली. रसवंती चालक ग्राहकांच्या मागणीचा अंदाज घेत स्वच्छता आणि गुणवत्तेवर भर देत थंडगार ऊसाचा रस उपलब्ध करून देत आहेत. काही ठिकाणी लिंबू, आले किंवा पुदिना घालून रस अधिक चविष्ट केला जात आहे. वाढत्या तापमानामुळे पुढील काही दिवस ही गर्दी कायम राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, धामणी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील आरोग्य अधिकारी डॉ. जयेश बिरारी आणि डॉ. मिरा खलते यांनी सांगितले की, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी नैसर्गिक पेयांचे सेवन करणे योग्य आहे. मात्र, स्वच्छ आणि सुरक्षित ठिकाणीच रस पिण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच उन्हातून आल्याबरोबर लगेच थंड पाणी किंवा थंड पेय पिऊ नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

## दररोज हजारो लोकांचा स्वयंपाक चुलीवर

### आंबेगाव तालुक्यात केटरर्स व्यावसायिकांची दमछाक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : स्वयंपाकाचा गॅस मिळत नसल्याने आंबेगाव तालुक्यातील केटरर्स व्यावसायिकांची अक्षरशः दमछाक सुरू आहे. सध्या तालुक्यातील गावांमध्ये यात्रांचा हंगाम सुरू असून बहुतांश गावांमध्ये ग्रामदैवतांच्या मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन करण्यात येत आहे. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना अन्नदान केले जाते. मात्र, गेल्या दीड महिन्यापासून स्वयंपाकाचा गॅस मिळत नसल्याने केटरर्स व्यावसायिकांना हजारो लोकांचा स्वयंपाक चुलीवर करावा लागत आहे.



विठ्ठल रखुमाई मंदिर पारगाव येथे बुधवार (दि. १) पासून अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला असून दररोज कीर्तनानंतर भाविक व ग्रामस्थांना अन्नदान केले जात आहे. पारगाव परिसरातील वाडी-वस्त्या आणि मळ्यांमधून भाविक मोठ्या संख्येने कीर्तनासाठी येत असून दररोज सुमारे एक हजार ते बाराशे लोकांना अन्नदान केले जाते. मात्र, आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून तालुक्यात व्यावसायिकांना गॅस मिळत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे. दररोज भात, वरण, लापशी, शिरा, बुंदी, पुरी, मसालेभात आदी पदार्थ तयार करावे लागतात. गॅस उपलब्ध नसल्याने हा सर्व स्वयंपाक चुलीवर करावा लागत असल्याने केटरर्स व्यावसायिकांची मोठी कसरत सुरू आहे.

पारगाव येथील श्रीकृष्ण केटरर्सचे संचालक निवृत्ती लोखंडे आणि पंकज लोखंडे यांनी सांगितले की, सध्या यात्रा हंगाम आणि लग्नसराईमुळे दररोज स्वयंपाकाच्या ऑर्डर आहेत. अनेक ऑर्डर आधीच घेतलेल्या आहेत. मात्र, गेल्या दीड महिन्यापासून स्वयंपाकासाठी गॅस मिळत नसल्याने चुलीवर हजारो लोकांचा स्वयंपाक तयार करावा लागत आहे. त्यामुळे मोठी दमछाक होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## विहिरीला संरक्षक कठडे बसविण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील पारगाव गावठाण ते लोखंडे मळा–दातखिळे मळा या प्रमुख रस्त्यालगत असलेली एक विहीर सध्या गंभीर धोक्याचे केंद्र बनली आहे. या रस्त्यावरून दररोज अनेक शाळकरी मुले, दुचाकीस्वार, चारचाकी वाहने तसेच शेतीकामासाठी जाणारी वाहने ये-जा करतात. मात्र रस्त्याच्या अगदी कडेला अत्यंत कमी अंतरावर असलेल्या या विहिरीला कोणत्याही प्रकारचे कठडे किंवा सुरक्षात्मक बांधकाम नसल्याने अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

नुकतीच दिंडोरी परिसरात कार विहिरीत पडून सहा शाळकरी मुलांसह एका कुटुंबातील नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले असून अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पारगाव परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



या पार्श्वभूमीवर पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे तसेच ग्रामपंचायत सदस्य काळुराम लोखंडे यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामपंचायतीकडे करणार असल्याचे सांगितले. "रस्त्यालगत असलेली ही विहीर पूर्णपणे उघडी असून अगदी थोड्या अंतरावरून वाहने जातात. एखाद्या वाहनचालकाचा तोल गेला किंवा मुलांचे पाय घसरले तरी मोठी दुर्घटना घडू शकते. विहिरीच्या अलीकडे उतार असल्यामुळे वाहनांचा वेग वाढतो आणि वाहनांवरील ताबा सुटण्याची शक्यता असते. त्यामुळे ग्रामपंचायतीने त्वरित कठडे, संरक्षण भिंत किंवा मजबूत जाळी बसवावी, ही अत्यंत तातडीची गरज आहे," असे त्यांनी सांगितले.

स्थानिक नागरिकांनीही या धोकादायक परिस्थितीकडे लक्ष वेधत रस्त्याच्या सुरक्षेसाठी तातडीने कामांना मंजुरी देण्याची मागणी केली आहे. संबंधित विहिरीभोवती मजबूत बांधकाम करणे तसेच सूचना फलक लावणे ही प्राथमिक गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## श्री क्षेत्र हटकेश्वर देवस्थानच्या पर्यटन विकासाला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : जुन्नर तालुक्यातील मौजे गोद्रे येथील श्री क्षेत्र हटकेश्वर देवस्थानच्या पर्यटन विकासाला गती देण्यासाठी सुमारे ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार शरददादा सोनवणे यांच्या पुढाकारातून हा निधी उपलब्ध झाल्याची माहिती आनंदा मांडवे यांनी दिली.

जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत देवस्थानाकडे जाणाऱ्या पायवाटा विकसित करण्यासाठी ७९.७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यास प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे. यामुळे परिसरातील पर्यटन सुविधा विकसित होण्यास मदत होणार आहे. या संदर्भात २ मार्च रोजी आदिवासी भागातील सामाजिक कार्यकर्ते काळू शेळकंदे आणि आनंद कांबळे यांनी आमदार शरद सोनवणे यांच्याशी चर्चा केली होती. त्यानंतर तातडीने या कामासाठी निधी मंजूर करण्यात आला. यावेळी आनंदा मांडवे, लोकनियुक्त सरपंच अनिता कैलास रेंगडे आणि कैलास रेंगडे उपस्थित होते.

आमदार शरद सोनवणे यांनी यावेळी हटकेश्वर देवस्थानाचा वनपर्यटनाच्या माध्यमातून विकास करण्याचा मानस व्यक्त केला. भविष्यात हे स्थळ भक्त-भाविकांसाठी एक जागृत तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

वन विभागाच्या माध्यमातून या विकासकामाचा आराखडा तयार करण्यात आला असून उपमुख्य वनसंरक्षक प्रशांत खाडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. या सर्व प्रक्रियेमुळे हटकेश्वर देवस्थानच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## चाकण येथे बनावट नोटांद्वारे कार खरेदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण** : बनावट नोटा देऊन मोटार खरेदी करत फसवणूक करणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलिसांनी पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून तब्बल ४२ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

याबाबत वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी माहिती दिली की, फिर्यादी हुजेब फिरोज बागवान (वय २६, रा. बारामती) हे मित्र अरबाज आयुब शेख यांची मोटार विक्रीसाठी पुण्यात आले होते. आरोपी गणेश ज्ञानदेव ठाकरे (वय २१) याने मोबाईलवरून संपर्क साधून मोटार खरेदीची इच्छा व्यक्त केली.

रविवारी (ता. ५) चाकणमधील माणिक चौक परिसरात व्यवहार ठरला. मोटारीची किंमत साडेतीन लाख रुपये ठरवून आरोपीने तीन लाख रुपये रोख स्वरूपात दिले.



प्लॅस्टिक रॅपरमध्ये गुंडाळलेल्या ५०० रुपयांच्या नोटांची सहा बंडले देण्यात आली, तर उर्वरित ५० हजार रुपये नावांतरणानंतर देण्याचे सांगितले. पैसे देताच आरोपी मोटार घेऊन पसार झाला.

यानंतर फिर्यादीने बंडले उघडून पाहिल्यावर वरची आणि खालची नोट खरी असली तरी मधील सर्व नोटा बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी तातडीने चाकण उत्तर पोलिस ठाण्यात धाव घेतली.

पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सचिन मोरखंडे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे काही तासांतच आरोपींचा माग काढला. गणेश ठाकरे आणि समीर दिनकर महल्ले यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून फसवणूक करून घेतलेली मोटार, ४२ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट ५०० रुपयांच्या नोटा, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी तसेच नोटांचे बंडल तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चाकण उत्तर पोलिस करत आहेत.

## पर्यावरण, शिक्षण व सामाजिक उपक्रमांवर भर

# वळतीचा ग्रापंचा समृद्ध पंचायतराज अभियानात पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील वळती ग्रामपंचायतीने शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ग्रामविकासासाठी विविध नाविन्यपूर्ण आणि लोकाभिमुख उपक्रम राबवले आहेत. आदर्श गावनिर्मितीच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानात वळती ग्रामपंचायतीने सर्वांगीण विकासाचा ठसा उमटवला आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी



ग्रामपंचायतीने मोठे पाऊल उचलत क्रिसिल फाउंडेशनच्या सहकार्याने सुमारे पाच एकर क्षेत्रावर नारळ, चिंच, लिंबू, बांबू आणि आंबा या विविध फळझाडांची सुमारे ७०० रोपे लावली आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून या झाडांचे संगोपन केले जात असून या उपक्रमामुळे हरित क्षेत्र वाढण्यासोबतच भविष्यात उत्पन्नाचे स्रोतही निर्माण होणार आहेत, अशी माहिती सरपंच तथा प्रशासक आनंद वाव्हळ यांनी दिली. सामाजिक बांधिलकी जपत दलित वस्तीतील नागरिकांसाठी गरम पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हिवाळ्यातील आरोग्य समस्यांचा विचार करून सुरू केलेली ही योजना नागरिकांसाठी उपयुक्त ठरत आहे. शैक्षणिक क्षेत्रातही ग्रामपंचायतीने पुढाकार घेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास सुलभ होऊन शाळेत उपस्थिती वाढण्यास मदत होत आहे. ग्रामपंचायतीच्या या सर्वसमावेशक उपक्रमांमुळे वळती गावाने समृद्ध पंचायतराज अभियानात भक्कम छाप पाडली आहे. ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, सकारात्मक दृष्टी आणि विविध संस्थांचे सहकार्य यामुळे गाव 'समृद्ध पंचायत' या उद्दिष्टाकडे वेगाने वाटचाल करत असल्याचा विश्वास सरपंच आनंद वाव्हळ यांनी व्यक्त केला आहे.

## शिरदाळेच्या पदाधिकाऱ्यांची पाटोदाला अभ्यास भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे ग्रामपंचायतीच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी राज्यात आदर्श ग्रामविकासासाठी प्रसिद्ध असलेल्या पाटोदा गावाला अभ्यास भेट दिली. आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या संकल्पनेतून विकसित झालेल्या पाटोदा गावातील कामकाजाचा अभ्यास करून त्याचा आदर्श शिरदाळे गावात राबवण्याचा उद्देश या भेटीमागे असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

भेटीदरम्यान भास्करराव पेरे पाटील प्रत्यक्ष उपस्थित नसले तरी दूरध्वनीद्वारे त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. लवकरच शिरदाळे गावाला भेट देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पाटोदा गावातील सुसज्ज ग्रामपंचायत इमारत, पारदर्शक प्रशासन, विविध विकासकामांचा सविस्तर लेखाजोखा आणि नियोजनबद्ध कामकाज यामुळे ग्रामविकासाचा आदर्श नमुना पाहायला मिळाला. गावातील सुसूत्रता, स्वच्छता आणि शिस्तबद्ध व्यवहार यामुळे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीत सरपंच मनोज तांबे, उपसरपंच बिपीन चौधरी, माजी सरपंच गणेश तांबे, माजी सरपंच राजेंद्र चौधरी तसेच सोसायटी संचालक जयदीप चौधरी उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### भूस्खलनामुळे जम्मू-श्रीनगर महामार्ग बंद

**जम्मू:** जम्मू आणि काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळे, महामार्गाची दुरुस्ती केल्यानंतर काही तासांतच मंगळवारी जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. २७० किलोमीटर लांबीच्या महामार्गावर २०० हून अधिक वाहने वेगवेगळ्या ठिकाणी अडकून पडली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### चरस आणि रोकडसह एक जण ताब्यात

**धर्मशाला (हिमाचल प्रदेश) :** हिमाचल प्रदेशातील कांग्रा जिल्ह्यातील मंडी-पठाणकोट महामार्गावर एका शिमला रहिवाशाला १.२५ किलो चरस आणि १ लाख रुपये रोख रकमेसह अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी उशिरा कांडवाल पोलीस चौकीचे एक पथक महामार्गावर नियमित वाहन तपासणी करत होते, तेव्हा जस्सूरच्या दिशेने येणाऱ्या एका काळ्या रंगाच्या ह्युंदाई क्रेटाच्या चालकाने अचानक गाडी वळवण्याचा प्रयत्न केल्याने संशय निर्माण झाला. तात्काळ कारवाई करत पोलीस पथकाने ते वाहन अडवले त्यावेळी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले.

### बंगळूरुमध्ये अमली पदार्थांवर कारवाई

**बंगळूर :** शहरात अवैधपणे अंमली पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी एका परदेशी नागरिकासह आठ जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. त्यांनी २७.४२ कोटी रुपयांचे अमली पदार्थ, वाहने आणि इतर वस्तू जप्त केल्या. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, वेगवेगळ्या तारखांना खबऱ्यांकडून मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना असे समजले की, हेब्बागोडी, येलहंका न्यू टाऊन, मिको लेआउट, परप्पना अग्रहारा, बागलूर आणि बनसवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एमडीएमए, गांजा आणि कोकेन यांसारख्या प्रतिबंधित मादक पदार्थांची विक्री केली जात होती.

## पाच जिल्ह्यांत इंटरनेट बंद, बॉम्बहल्ल्यानंतर तणावात वाढ

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**इम्फाळ :** मणिपूरमध्ये वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कडक पावले उचलत खोऱ्यातील पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेट आणि मोबाईल डेटा सेवा तीन दिवसांसाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल, काकचिंग आणि बिष्णुपूर या जिल्ह्यांमध्ये ब्रॉडबँड, व्ही-सॅट आणि व्हीपीएनसह सर्व इंटरनेट सेवा तात्पुरत्या स्वरूपात निलंबित करण्यात आल्या आहेत. गृह विभागाच्या निवेदनानुसार, "चुकीची माहिती आणि अफवांचा प्रसार रोखण्यासाठी" हा निर्णय घेण्यात आला आहे. मंगळवारी पहाटे बिष्णुपूर जिल्ह्यात झालेल्या भीषण बॉम्बस्फोटानंतर ही परिस्थिती निर्माण झाली.

पोलीस सूत्रांनुसार, मोइरांग ट्रोंगलाओबी परिसरात अज्ञात दहशतवाद्यांनी एका घरावर बॉम्ब फेकला. या हल्ल्यात पाच वर्षांचा मुलगा आणि सहा महिन्यांची मुलगी अशा दोन निष्पाप बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले आणि अनेक ठिकाणी हिंसक निदर्शने झाली.

आंदोलनादरम्यान संतप्त जमावाने पेट्रोल पंपाजवळ दोन तेलाचे टँकर आणि एक ट्रक जाळला. तसेच त्रोंगलाओबी परिसरातील केंद्रीय सुरक्षा दलाच्या छावणीवर हल्ला करण्यात आला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान झालेल्या गोळीबारात किमान चार जण जखमी झाले. "गोळीबार नेमका कोणी केला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही," अशी माहिती पोलिसांनी दिली. बॉम्बस्फोटानंतर पोलिसांच्या बॉम्ब पथकाने एक स्थानिक बनावटीचा मोर्टारही निकामी केला. इम्फाळ खोऱ्यातील शाळा, दुकाने आणि बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या आहेत. विविध भागांत आंदोलकांनी टायर जाळून रस्ते रोखले. काही ठिकाणी महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. सुरक्षा दलांच्या वाहनांना अडवून आंदोलन करण्यात आले, ज्यामुळे परिस्थिती आणखी तणावपूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी उच्चस्तरीय बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. "राज्यात शांतता आणि स्थैर्य लवकरात लवकर पुनर्संचयित करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व पर्यायांचा विचार करून कठोर पावले उचलली जातील," असे त्यांनी स्पष्ट केले.

या हल्ल्याला "अमानुष आणि रानटी कृत्य" असे संबोधत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यात वाढत चाललेल्या तणावामुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवणे प्रशासनासमोर मोठे आव्हान बनले आहे.

## '१.४ कोटी इराणी नागरिक युद्धासाठी तयार'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दुबई :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. अमेरिकेकडून देण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या पार्श्वभूमीवर इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियन यांनी मंगळवारी दावा केला की, स्वतःसह सुमारे १.४ कोटी इराणी नागरिक युद्धासाठी आणि बलिदानासाठी तयार असल्याचे सांगितले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणने होर्मुझची सामुद्रधुनीवरील नियंत्रण सैल न केल्यास तेथील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ला करण्याचा इशारा दिला होता. या मुदतीपूर्वीच पेझेश्कियन यांनी हा मोठा दावा करत अमेरिकेला अप्रत्यक्ष इशारा दिल्याचे मानले जात आहे.

सरकारी माध्यमांनुसार, युद्धस्थिती लक्षात घेऊन इराण सरकारने देशभरात स्वयंसेवकांसाठी संदेश आणि माध्यमांतून आवाहन केले होते. या प्रतिसादात १४ दशलक्ष नागरिकांनी देशासाठी प्राणार्पणाची तयारी दर्शवल्याचा दावा करण्यात आला आहे. हा आकडा यापूर्वी जाहीर झालेल्या आकड्यांच्या तुलनेत दुप्पट असल्याचेही सांगितले जात आहे.

इराणची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी असून, अलीकडील काळात देशांतर्गत असंतोष आणि आंदोलनांवर सरकारने केलेल्या कारवाईमुळे जनतेत नाराजी असल्याचेही निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येचा दावा हा अमेरिकेच्या संभाव्य कारवाईला रोखण्यासाठी धोरणात्मक दबाव तंत्राचा भाग असू शकतो, असेही जाणकारांचे म्हणणे आहे. "१४ दशलक्षाहून अधिक इराणी नागरिकांनी आत्मबलिदानासाठी तयारी दर्शवली आहे," असे पेझेश्कियन यांनी स्पष्ट करत देशाच्या संरक्षणासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली.

दरम्यान, इराणला मंगळवारी सायंकाळी ८ वाजेपर्यंतची मुदत अमेरिकेने दिली आहे.

## भारत-अमेरिका संबंधांना नवी चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत-अमेरिका संबंधांना अधिक बळकटी देण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली जात आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री हे बुधवारपासून वॉशिंग्टन डीसी येथे तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर जात आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ८ ते १० एप्रिलदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. विशेषतः व्यापार, संरक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान आणि प्रादेशिक सुरक्षेच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात समन्वय वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर दंडात्मक शुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. तसेच भारत-पाकिस्तान संघर्षावर केलेल्या त्यांच्या वक्तव्यांमुळेही वाद निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संबंध पुन्हा स्थिर करण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

या भेटीदरम्यान प्रस्तावित भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारावरही पुढील दिशा ठरवण्याची शक्यता आहे. तसेच संरक्षण सहकार्य वाढवणे, तंत्रज्ञानातील भागीदारी मजबूत करणे आणि जागतिक पातळीवरील सामायिक हितसंबंधांवर एकत्र काम करण्याबाबत चर्चा अपेक्षित आहे. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, हा दौरा दोन्ही देशांमधील नियमित उच्चस्तरीय संवादाचा भाग आहे. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात परराष्ट्र मंत्र्यांचा वॉशिंग्टन दौरा झाला होता. त्या पार्श्वभूमीवर ही भेट संबंधांना नवी गती देणारी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## पश्चिम बंगालमध्ये ९१ लाख नावे वगळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेनंतर मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर बदल झाल्याचे समोर आले आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, या प्रक्रियेदरम्यान सुमारे ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. या घडामोडीमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, पारदर्शकतेवरून वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अंतिम सुधारित मतदार यादी अद्याप जाहीर करण्यात आलेली नसली तरी २८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या प्राथमिक आकडेवारीत मोठी कपात झाल्याचे स्पष्ट झाले होते. नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या पुनरावलोकन प्रक्रियेत सुरुवातीला ६३.६६ लाख नावे वगळण्यात आली होती. त्यामुळे राज्यातील एकूण मतदारसंख्या ७.६६ कोटींवरून सुमारे ७.०४ कोटींवर आली होती.

या प्रक्रियेत "न्यायनिर्णयाधीन" म्हणून नोंद असलेल्या ६०.०६ लाख प्रकरणांची स्वतंत्र तपासणी करण्यात आली. न्यायिक अधिकाऱ्यांनी केलेल्या छाननीनंतर यापैकी २७.१६ लाखांहून अधिक नावे वगळण्यात आली, तर सुमारे ३२.६८ लाख नावे वैध ठरवून अंतिम यादीत कायम ठेवण्यात आली. परिणामी, एकूण वगळण्यात आलेल्या नोंदींची संख्या आता अंदाजे ९०.८३ लाखांपर्यंत पोहोचली आहे.

निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया "टप्प्याटप्प्याने आणि पारदर्शकपणे" पार पाडल्याचा दावा केला आहे. उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी जिल्हानिहाय आकडेवारी सार्वजनिक करण्यात आली असून ६०.०६ लाख न्यायनिर्णय प्रकरणांपैकी ५९.८४ लाख प्रकरणांची माहिती जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित २२,१६३ प्रकरणांवर प्रक्रिया पूर्ण झाली असून ती ई-स्वाक्षरीच्या प्रतीक्षेत आहेत. प्रक्रियात्मक औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर आकडेवारीत किरकोळ बदल होऊ शकतात, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, अंतिम पुरवणी यादी जाहीर झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेनुसार पहिल्या टप्प्यासाठी मतदार याद्या गोठवण्यात आल्या आहेत. राज्यातील २९४ विधानसभा जागांपैकी १५२ जागांवर २३ एप्रिल रोजी, तर उर्वरित १४२ जागांवर २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यासाठीच्या मतदार याद्या ९ एप्रिल रोजी गोठवण्यात येणार आहेत.

## कांगेर व्हॅली उद्यानातील बांधकामांवर केंद्राची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रायपूर :** दक्षिण छत्तीसगडमधील बस्तर परिसरातील कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यान येथे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागात झालेल्या कायमस्वरूपी बांधकामांवरून वाद निर्माण झाला असून केंद्र सरकारने या प्रकरणात थेट हस्तक्षेप केला आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने छत्तीसगड सरकारला बेकायदेशीर पर्यावरण-पर्यटन प्रकल्पांच्या आरोपांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

अधिवक्ता व्यास मुनी द्विवेदी यांनी केलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले. संवेदनशील ग्रीन केव्ह (कुटुमसर परिसर) भागात 'स्वागत द्वार' आणि 'सिमेंटच्या पायऱ्या'सारखी कायमस्वरूपी बांधकामे करण्यात आल्याचा आरोप आहे. ही कामे वन संरक्षण कायदा १९८० चे उल्लंघन करून करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. केंद्राच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राष्ट्रीय उद्यानांसारख्या संरक्षित क्षेत्रांमध्ये केंद्रीय परवानगीशिवाय कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम करण्यास सक्त मनाई आहे. मात्र, तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार या कामांसाठी सुमारे ४८.४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून तो दोन टप्प्यांत वितरितही करण्यात आला होता. वन उपमहानिरीक्षक दीपिका चौधरी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आले असून, ते प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि संबंधित नोडल अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहेत. संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून कायद्याच्या चौकटीत आवश्यक ती कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. निर्देशांनुसार, वनक्षेत्रातील कायमस्वरूपी बांधकामांना "गैर-वनिकी उपक्रम" मानले जाते आणि त्यासाठी केंद्राची पूर्वपरवानगी आवश्यक असते.

## अल्पसंख्याक समाजाला हेतुपुरस्सर वगळले

# ममता बॅनर्जींचा केंद्रावर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये वादग्रस्त विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेवरून राजकीय वातावरण तापले असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक यंत्रणेवर गंभीर आरोप केले आहेत. मतुआ, राजवंशी आणि अल्पसंख्याक समाजातील मतदारांना हेतुपुरस्सर मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

नादिया जिल्ह्यातील चकदाहा येथे आयोजित सभेत बोलताना बॅनर्जी यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, "हा भेदभाव का? तुम्ही मतुआ, राजवंशी आणि अल्पसंख्याकांना लक्ष्य करत आहात. लोकांना हे समजत नाही असे तुम्हाला वाटते का?" त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील निवडणूक राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. मतदार याद्यांमधून मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याचा मुद्दा उपस्थित करत बॅनर्जी यांनी विशेषतः मुर्शिदाबाद, मालदा आणि उत्तर दिनाजपूर या अल्पसंख्याकबहुल जिल्ह्यांचा उल्लेख केला.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, एसआयआर प्रक्रियेनंतर मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली गेली आहेत. २८ फेब्रुवारीला जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, सुमारे ६३.६६ लाख नावे वगळण्यात आली असून ही संख्या एकूण मतदारसंख्येच्या सुमारे ८.३ टक्के आहे. त्यामुळे राज्यातील मतदारसंख्या सुमारे ७.६६ कोटींवरून ७.०४ कोटींवर आली आहे. काही अंदाजांनुसार अंतिम यादीतून जवळपास ९१ लाख नावे वगळली गेल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, अंतिम सुधारित मतदार यादी अद्याप जाहीर झालेली नाही. या पार्श्वभूमीवर बॅनर्जी यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप केल्यानंतर सुमारे ६० लाख प्रकरणांपैकी जवळपास ३२ लाख नावे पुन्हा समाविष्ट करण्यात आली आहेत. उर्वरित मतदारांनी न्यायाधिकरणाकडे अर्ज करावा, असे आवाहन करत त्यांनी तृणमूल काँग्रेसकडून कायदेशीर मदतीचे आश्वासन दिले. केंद्र सरकारवर निशाणा साधताना त्यांनी घुसखोरीच्या मुद्द्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "सीमांचे संरक्षण करणे ही केंद्राची जबाबदारी आहे. मात्र, त्यासाठी राज्य सरकारला दोष दिला जात आहे," असे त्यांनी नमूद केले.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा महत्त्वाचा ठरत आहे. २९४ सदस्यीय पश्चिम बंगाल विधानसभेसाठी २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. या निवडणुकीला "लोकशाही, ओळख आणि सन्मान वाचवण्याची लढाई" असे स्वरूप देत बॅनर्जी यांनी मतदारांना मतदानाद्वारे आपला आवाज उठवण्याचे आवाहन केले.

## पवन खेरांच्या दिल्लीतील घरात पोलिसांची झडती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आसाममधील राजकारणात मोठा वाद निर्माण झाला असून मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान यांच्यावर गंभीर आरोप केल्यानंतर काँग्रेस नेते पवन खेरा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी मंगळवारी आसाम पोलिसांनी झडती घेतली.

पोलीस उपआयुक्त देबजित नाथ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. झडतीदरम्यान खेरा त्यांच्या घरी उपस्थित नव्हते. आसाम पोलिसांनी दिल्ली पोलिसांना पूर्वसूचना देऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने ही कारवाई पार पाडली. या कारवाईमागे रिनिकी भुयान यांनी गुवाहाटी येथील गुन्हे शाखेत दाखल केलेल्या एफआयआरचा आधार असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेरा यांच्यावर बनावट कागदपत्रे तयार करणे आणि इतर संबंधित आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वादाची सुरुवात रविवारी खेरा यांनी पत्रकार परिषदेत केलेल्या दाव्यांमुळे झाली. त्यांनी असा आरोप केला होता की, भुयान यांच्याकडे संयुक्त अरब अमिरात, इजिप्त आणि अँटिग्वा-बार्बुडा या देशांचे पासपोर्ट आहेत. तसेच परदेशात मोठ्या प्रमाणावर मालमत्ता आणि गुंतवणूक असल्याचे कथित दस्तऐवज त्यांनी सादर केले होते. मुख्यमंत्री सरमा यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात या मालमत्तेचा उल्लेख नसल्याचाही त्यांनी दावा केला. मात्र, सरमा आणि त्यांच्या पत्नीने हे सर्व आरोप फेटाळून लावत कायदेशीर कारवाईचा इशारा दिला. "पासपोर्ट खरे की बनावट, याचा तपास करण्यासाठी पोलिसांना दिल्लीला पाठवले जाईल," असे सरमा यांनी स्पष्ट केले होते.

या पोलिस कारवाईवरून काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया देत याला "सूडाची मोहीम" असे संबोधले. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी आरोप केला की, विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी शासकीय यंत्रणेचा गैरवापर केला जात आहे. "जनहिताचे प्रश्न विचारल्यामुळे पोलिसांची फौज पाठवली जात आहे, यावरून मुख्यमंत्री घाबरलेले आहेत," असे ते म्हणाले.

काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करत सरमा यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### खेरा हैदराबादला फरार झाले

**शिवसागर :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी मंगळवारी दावा केला की, मुख्यमंत्री आणि त्यांच्या कुटुंबावर झालेल्या आरोपांशी संबंधित एका प्रकरणात अटक करण्याचे आव्हान दिल्यानंतर काँग्रेस नेते पवन खेरा हैदराबादला "पळून गेले" आहेत. पवन खेरा यांनी आसाम पोलिसांना अटक करण्याचे आव्हान दिले होते, पण आता ते हैदराबादला पळून गेले आहेत, असे शर्मा यांनी शिवसागर येथे एका निवडणूक प्रचार सभेच्या निमित्ताने सांगितले.

## जयपूर येथे सायबर घोटाळा उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर :** देशभरातील निर्यातदार कंपन्यांना लक्ष्य करत मोठ्या प्रमाणावर सायबर फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा जयपूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. जयपूर पोलीस आयुक्तालयच्या तपासानुसार, परकीय व्यापार महासंचालनालय आणि आसीई गेट पोर्टल प्रणालीचा गैरवापर करून ४०० हून अधिक कंपन्यांच्या संचालकांच्या प्रोफाइलमध्ये फेरफार करण्यात आला. या घोटाळ्यामुळे शेकडो कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

या प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, हे रॅकेट दुबईतून कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या तपासात असे उघड झाले की, आरोपींनी बनावट आधार आणि पॅन कार्डचा वापर करून डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट्स मिळवले. ही प्रमाणपत्रे सामान्यतः कंपनी संचालकांची डिजिटल ओळख पडताळण्यासाठी वापरली जातात. मात्र, आरोपींनी त्याचाच गैरवापर करून पोर्टलवर अनधिकृत प्रवेश मिळवला. एकदा प्रणालीत प्रवेश मिळाल्यानंतर आरोपींनी संबंधित कंपन्यांच्या खात्यांशी जोडलेले ईमेल आयडी आणि मोबाईल क्रमांक बदलले. त्यानंतर संचालकांची माहिती बदलून खात्यांवर पूर्ण ताबा मिळवला. पुढे त्यांनी निर्यातदारांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहन योजनांअंतर्गत मिळणाऱ्या 'ड्यूटी क्रेडिट स्क्रिप्स' बनावट खात्यांमध्ये हस्तांतरित केल्या आणि त्यांची विक्री करून पैसे वळवले.

## आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्य आणि जलद प्रतिसाद क्षमतेसाठी सक्षम करणार

# भोपाळ येथे दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भोपाळ :** दहशतवादविरोधी क्षमतेला अधिक बळकटी देण्यासाठी मध्य प्रदेश सरकारने मोठा निर्णय घेतला असून राजधानी भोपाळच्या बाहेरील तुमडा परिसरात अत्याधुनिक 'काउंटर टेररिझम ग्रुप' (सीटीजी) प्रशिक्षण केंद्र उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी सोमवारी लाल परेड मैदानावर राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या (एनएसजी) प्रात्यक्षिक कार्यक्रमानंतर ही माहिती दिली.

राज्यातील पोलीस दलाला आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्य आणि जलद प्रतिसाद क्षमतेने सक्षम करण्यासाठी सुमारे २०० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, या प्रकल्पाला लवकरच गती दिली जाणार आहे. या केंद्रामुळे दहशतवादी हल्ले, शहरी बंडखोरी आणि 'लोन वुल्फ' प्रकारातील हल्ल्यांना तोंड देण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रशिक्षण केंद्रात राज्याच्या दहशतवादविरोधी पथक (एटीएस), विशेष कृती दल (एसटीएफ), विशेष सशस्त्र दल (एसएएफ) तसेच जलद प्रतिसाद पथक (क्यूआरटी) आणि कमांडो यांना अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाईल. गरज भासल्यास इतर राज्यांतील पोलीस दलांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे हे केंद्र राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मध्य प्रदेशाचे भौगोलिक स्थान लक्षात घेता, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी हे केंद्र 'स्ट्रॅटेजिक हब' ठरणार आहे. आतापर्यंत अशा प्रकारच्या प्रशिक्षणासाठी राज्य पोलिसांना हरियाणातील मानेसर येथील एनएसजी केंद्रावर अवलंबून राहावे लागत होते. नव्या केंद्रामुळे हे अवलंबित्व कमी होणार आहे. अलीकडच्या काळात भोपाळ आणि परिसरात हिजब-उत-तहरीर आणि जमात-उल-मुजाहिदीन बांगलादेश यांसारख्या संघटनांच्या हालचाली उघड झाल्याने राज्यातील सुरक्षा यंत्रणांना अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित झाली होती. या पार्श्वभूमीवर सीटीजी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, एनएसजी आणि मध्य प्रदेश पोलिसांच्या संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमालाही सुरुवात झाली असून ७ एप्रिल ते ४ मे या कालावधीत सुमारे महिनाभर विविध तांत्रिक आणि प्रतिहल्ला कारवायांवरील प्रशिक्षण दिले जाणार आहे.

राज्याचे पोलीस महासंचालक कैलाश मकवाना यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी पोलीस दल सज्ज केले जात आहे. या नव्या प्रशिक्षण केंद्रामुळे राज्यातील सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम होऊन भविष्यातील संभाव्य धोके प्रभावीपणे हाताळण्यास मदत होईल, असा विश्वास सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे.